# प्रकरण २ रे

# शैक्षणिक तंत्रविज्ञान व ग्रामीण पुनर्रचना

या प्रकरणात शैक्षणिक तंत्रविज्ञान अर्थ व महत्व, दृकश्राव्य साधने व त्याचे वर्गीकरण. ग्रामीण पुर्नरचना, ग्रामीण पुनर्रचनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या ग्रामीण पुनर्रचनेत उपयोग इ. बाबीचा समावेश केला आहे.

**शैक्षणिक तंत्रविज्ञान अर्थ व महत्त्व :**

आज आपला देश एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत आहे. प्रत्येक क्षेत्रात झपाटयाने बदल होत आहेत. ज्ञानही प्रचंड गतीने वाढते आहे. तंत्रविज्ञानात लक्षणीय बदल होत आहेत. विविध अत्याधुनिक साधनांची निर्मिती होत आहे म्हणून शिक्षणात त्याचा उपयोग करून भारताच्या ग्रामीण, आदिवासी भागात अधिक प्रभावशाली पध्दतीने व गतीने शिक्षण पोहचविणे ही काळाची गरज आहे. भारतातील निरक्षरतेचे प्रमाण पाहता शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा उपयोग करून अनेक भागापर्यंत शिक्षण प्रभावी रितीने पोहचविणे आवश्यक आहे. त्यामुळे दिवसेंदिवस शैक्षणिक तंत्रविज्ञानाचे महत्त्व वाढतच आहे. यासाठी शैक्षणिक तंत्रविज्ञा म्हणजे काय? त्यातील कोणत्या साधनाचा उपयोग ग्रामीण पुनर्रचनेसाठी करता येईल यासाठी साधनाचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक तंत्रविज्ञान :**

"शैक्षणिक तंत्रविज्ञान या संज्ञेमध्ये शिक्षण व तंत्रविज्ञान या दोन शब्दांचा संबंध येतो. विज्ञान याचा अर्थ ज्ञान मिळविण्याची पध्दती, शिक्षण याचा अर्थ ज्ञान, भावना, अनुभव, कौशल्य यांचे प्रेषक व ग्राहक यामध्ये विविध माध्यमाव्दारे होणारे दळणवळण. तंत्रज्ञान हा शब्द इंग्रजीतील Technology या शब्दाला पर्याय म्हणून उपयोगात आणला जातो या दृष्टीने Educational Technology is the systematic application of scientific or other organised knowledge of practical अशी व्याख्या केली जाते. या दृष्टीने शैक्षणिक तंत्रविज्ञान याचा अर्थ शिक्षण प्रक्रियेचे विशिष्ट पध्दतीने समग्र ज्ञान मिळविणे व त्या ज्ञानाचा, शिक्षण प्रक्रिया परिणामकारक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने पध्दतशीर वापर करणे म्हणजे शैक्षणिक तंत्रविज्ञान". [१]

शैक्षणिक तंत्रविज्ञानात खालील गोष्टींचा समावेश होतो.

१. शास्त्रीय दृष्टीकोन

२. समस्येचे निराकरण करण्यास संश्लेषण, विश्लेषण, मूल्यमापन यांचा उपयोग

३. नवीन तंत्रे पध्दतींना मोकळ्या मनाने सामोरे जाण्याची तयारी

४. जुन्या कालबाह्य पध्दती टाकून देण्याची तयारी

५. शैक्षणिक प्रक्रिया काटकसरीची व परिणामकारक करण्याची उत्सुकता

६. अभ्यासक्रम समर्पक व अर्थपूर्ण असावा या मागणीबाबत कळकळ

थोडक्यात "शैक्षणिक तंत्रविज्ञान म्हणजे शास्त्रीय दृष्टीकोन, नवीन तंत्राबाबत पूर्वग्रहरहित वृत्ती, कालबाह्य झालेल्या गोष्टी टाकून देण्याची तयारी व शिक्षण प्रक्रिया अर्थपूर्ण समर्पक व परिणामकारक काटकसरीची बनविण्याची शास्त्रशुध्द पध्दती". [२]

अमेरिकेतील कौन्सिल ऑफ एज्युकेशन टेक्नालॉजी प्रमाणे शैक्षणिक तंत्रविज्ञानाची व्याख्या "Educational technology is the development, application and evaluation of system technques and aids to improve the process of human learning".[३]

यादृष्टीने विविध तंत्रपध्दती विकसित करून अध्ययन प्रक्रिया परिणामकारक करणे महत्त्वाचे. शैक्षणिक तंत्रविज्ञानाची व्याप्ती ही दिवसेंदिवस वाढत आहे. शिक्षणाच्या विविध अंगाचा विचार करून त्याचे स्वतंत्र विभाग केले जात आहेत. पाठ्यवस्तू व पाठ्यवस्तूंची मांडणी करणारे अनुदेश तंत्रविज्ञान, विद्यार्थी व शिक्षक यांच्या वर्तनाचा अभ्यास करणारे वर्तनवादी तंत्रविज्ञान अध्यापनाचा अभ्यास करणारे अध्यापन तंत्रविज्ञान व माध्यमाचा अभ्यास करणारे माध्यम तंत्रविज्ञान याचा समावेश आहे.

या ग्रामीण पुनर्रचनेतील शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा विचार करताना मुख्यतः माध्यम तंत्रविज्ञानाचा उपयोग अधिक केला आहे. तसेच विविध नवीन तंत्रे व पध्दती लोकशिक्षणासाठी उपयोगात आणली आहेत. तांत्रिक बदलाच्या लाटेमुळे ज्ञान मिळविण्याची माध्यमे व पध्दती यामध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. तसेच गेल्या हजार वर्षात प्राप्त झाली नाही इतकी प्रचंड नवीन माहिती मानवाला गेल्या पंधरा वर्षात प्राप्त झाली आहे. या ज्ञानाचा उपयोग करण्याचे आव्हान शिक्षणाला स्वीकारायचे असून त्यासाठी आधुनिक तंत्रविज्ञानाचा उपयोग करणे जरूरीचे आहे आणि म्हणून शैक्षणिक तंत्रविज्ञानाचे महत्त्व अधिक आहे. एकूण भारतातील निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. जागतिक बँकेच्या पाहणीनुसार विसाव्या शतकाच्या अखेरीस जगातील एकूण निरक्षरपैकी ५०% लोक भारतीय असतील. या निरक्षरतेबरोबर येणाऱ्या अंधश्रध्दा, अनारोग्य, प्रगतीला खीळ घालणाऱ्या रूढी, परंपरा यांचे प्राबल्य या गोष्टी येतात आणि या गोष्टी दूर करण्यासाठी तंत्रविज्ञानाचा उपयोग महत्त्वाचा ठरतो. कारण नवीन माध्यम

तंत्रविज्ञानातून अनौपचारिक शिक्षण अधिक प्रभावीपणे देता येणे शक्य होते. अनेक दृकश्राव्य साधने उपयोगात आणता येतात. यादृष्टीने दृकश्राव्य साधनांचे वर्गीकरण महत्त्वाचे ठरेल.

**दृकश्राव्य शिक्षण साहित्याचे वर्गीकरण :**

दृकश्राव्य शिक्षण साहित्यात फलकापासून दूरचित्रवाणीपर्यंत विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश होतो. या साहित्याची माहिती मिळविणे सुलभ व्हावे म्हणून एकाच प्रकाराचेच साहित्य एकत्र करून गट केले आहेत.

१. दृक-शिक्षण साहित्य


२. श्राव्य-शिक्षण साहित्य

३. दृक-श्राव्य शिक्षण साहित्य

हेच वर्गीकरण खालील आकृतीवरून स्पष्ट होते.

आकृती पुढील पानावर

**दृक-श्राव्य शिक्षण साहित्य - आकृती**




(मधुकर सोनार दृक-श्राव्य शिक्षण साहित्य तंत्र व पध्दती पुणे

गो. य. प्रकाशन पृ. क्र. १६.)

वरील दृकश्राव्य साधनांचे अधिक सूक्ष्म वर्गीकरण डॉ. न. रा. पारसनीस यांनी दिले आहे.

**अ) रेखाचित्रिय साधने**

१) छायाचित्रे, रंगचित्रे, चित्रे वगैरे. २) भित्ती पत्रके ३) तक्ते ४) आकृती ५) आलेख ६) नकाशे ७) व्यंगचित्रे ८) हास्यचित्रे

**ब) त्रिमिती - दर्शक साधने**

१) प्रतिकृती २) पदार्थ ३) नमुने ४) कळसूत्री बाहुली त्रिमिती साधने रेखाचित्रीय साधनासारखी सपाट नसतात. पण वास्तवतेचे स्पष्ट व वस्तुस्थिती निदर्शक दर्शन घडवितात. त्यामुळे अध्ययनात प्रत्यक्ष दिसणारा अनुभव घेता येतो.

**क) प्रदर्शनीय फलक**

१) खडू, फळा २) वार्ताफलक ३) खादी फलक ४) लोहचुंबकीय फलक ५) सिमेंट फलक ६) स्लेट फलक.

**ड) प्रक्षेपित साधने**

१) चित्रपट २) सरळ चित्र ३) स्थिर चित्रपट्टी (फिल्म स्ट्रिप) ४) एपिडायास्कोप प्रक्षेपित साधनामुळे अध्यापन साधनांची व्यापकता दिसून येते.

**इ) तंत्रज्ञानविषयक दृक-श्राव्य साधने**

१) रेडिओ २) टेलिव्हिजन ३) टेप रेकार्डर

**फ) क्रियात्मक साधने**

१) शैक्षणिक सफरी व सहली २) प्रात्यक्षिके ३) नाट्यीकरण [9]

वरील साधनांचा उपयोग शिक्षण अधिक परिणामकारक करण्याकरीता होतो. ग्रामीण भागातील अनौपचारिक शिक्षणात दृक-साधने प्रदर्शने, तक्ते तसेच तंत्रविज्ञान विषयक साधने आकाशवाणी दूरदर्शन व त्यावरील कार्यक्रम - चित्रफिती यांचा उपयोग होतो.

तसेच ज्ञान देण्यासाठी विविध पध्दती उपयोगात आणता येतात. त्यात १) गटचर्चा २) व्याख्याने ३) परिसंवाद यांचा उपयोग केला जातो.

या सर्वांचा उपयोग ग्रामीण पुनर्रचनेत करावयाचा आहे. म्हणून ग्रामीण पुनर्रचनेची संकल्पना अधिक स्पष्ट करणे व त्यात कोणत्या क्षेत्रासाठी वरील साधनांचा उपयोग करता येईल हे पाहणे अधिक संयुक्तिक ठरेल.

**ग्रामीण पुनर्रचना :**

''पुनर्रचना याचा अर्थ एखादया गोष्टींची नव्याने मांडणी करणे या शब्दप्रयोगात असा अर्थ अभिप्रेत आहे की ब्रिटीश राजवटीच्या काळात येथील ग्रामीण समाजाची जी दुर्दशा झाली ती थांबवून या समाजाला पुन्हा समर्थ पायावर उभे करणे थोडक्यात ग्रामीण समाजाची सर्वांगीण प्रगती घडवून आणणे आणि ग्रामीण समस्यांचे निराकरण करणे म्हणजे पुनर्रचना होय''[१]

ब्रिटिश राजवटीपूर्वी भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती सामूहिक जीवन जगत होती. ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक सत्तेच्या केंद्रीकरणाचे धोरण अवलंबिल्याने स्वयंपूर्ण खेड्यातील सामाजिक संस्था निस्तेज झाल्या. या संस्थांची स्वायत्तता व सुसूत्रता राखण्याचे ब्रिटिशांनी हेतुपुरस्सर टाळले अतिरिक्त व्यक्तीकरण परस्परातील अनुबंध तुटलेला समाज निर्माण करण्यास अनुकूल वातावरण तयार केले. त्यामुळे सांघिक सामूहिक जीवनाला भारतीय समाज पारखा झाला.

पूर्वी ग्रामीण जीवनात विविध संस्था होत्या व त्या अनुरोधाने गावात नेतृत्त्व होते, सामूहिक विकासाची भावना होती. अगदी प्राचीन काळी सुध्दा या स्वरूपाचे वातावरण संस्थामध्ये होते. या संदर्भात वि. दा. केसरी यांनी म्हटले आहे, ''मोहेन-जो-दडो येथे सापडलेल्या अवशेषावरून वेदादी ग्रंथात असलेल्या पुराव्यावरून वेदपूर्व काळात म्हणजे

इ. स. पूर्व ३००० ते १००० ग्रामीण भागात राहणारे लोक सुशिक्षित होते. त्यांना अनियंत्रित स्वायत्तता होती. गावाचा प्रमुख सर्व कार्यात अग्रेसर राहून सुव्यवस्था व कायदा याचे पालन करी व त्याला सर्व प्रकारची मदत देणे गावातील समितीचे काम असे समितीशी सल्ला मसलत करून तो निर्णय घेत असे.''[७] म्हणजे गावातील हे संघटित स्वरूप, विकासातील सहभाग हा प्राचीन काळापासून परंपरेतून चालत आलेला होता. परंतु ब्रिटिश काळात याला तडे गेले. या संदर्भात कै. धनंजयराव गाडगीळ यांचे शब्द अर्थपूर्ण आहेत. ते म्हणाले होते, ''खरोखर ब्रिटिश समाजाबद्दल घृणा वाटण्यासारखे जे काही असेल ते ही की आमचा समाज त्या योगे दुर्बल झाला, विभागला गेला. स्वत:च्या पायावर उभे राहण्याची आमची शक्ती लुप्त झाली तिची आठवण सुध्दा गेली. हानी आमची झाली तेव्हा आपल्याला हे सगळे पुन्हा विचार करून उभे करायचे आहे.''[८]

ब्रिटिशांच्या धोरणाने हस्तव्यवसाय बंद झाले. लोक दरिद्री बनले खेड्यातील संघटन व स्वायत्तता हे महत्त्वाचे घटक नाहिसे होऊ लागले अज्ञान, निरक्षरता व कर्जबाजारीपण आले गलिच्छ वस्त्या व रोगराई हे खेड्यांचे अंग बनले. बुध्दिमान लोक शहरात गेल्यामुळे गावाचे नेतृत्व बेजबाबदार लोकांच्या हातात गेले. हे सर्व घालवून खेडयात संघटित शक्ती उभी करणे, आत्मविश्वास निर्माण करणे, खेड्यातील अस्वच्छता नाहीशी करणे, गावातील लोकांचा सहभाग गावविकासात घेणे, स्वावलंबन व आत्मविश्वास निर्माण करून गाव पुन्हा समर्थपणे उभे करणे हा अर्थ पुनर्रचनेत अभिप्रेत आहे. धनंजयराव गाडगिळांनाही हाच अर्थ अभिप्रेत होता.

ग्रामीण पुनर्रचना व ग्रामीण विकास यातही फरक आहे. दोन्ही कल्पना या विकासाशी निगडीत आहेत पण त्यातही फरक आहे. विकासात नवीन योजना गावाला देणे, कर्जपुरवठा करणे उद्योगासाठी मदत करणे इ. गोष्टी अभिप्रेत आहेत. परंतु बऱ्याच वेळा त्याच गावातील लोकांना गृहित धरले जाते. त्याच्यासाठी असलेल्या योजना



13579

ठरविताना त्यांचा सहभाग घेतला जातोच असे नाही. पण पुनर्रचनेत मात्र लोकाना महत्त्व दिले जाते. यातील फरक एस. एस्. कुलकर्णी यांनी Educational Technology for rural reconstruction या लेखात स्पष्ट केला आहे.

"The term development has become a widely used word and hence it means different things to different people. To some rural development indicates the schemes like milk distribution or Nutrition programme or social forestry schemes which are prepared by the Government bureaucracies and in the sense folk themselves are not partly to the framing of these schemes some of these developers argue that villagers are illterate people therefor they do not understand and hence they need not be consulted. They should only be told what is good for them." असे सांगून ते पुढे म्हणतात,

"Rural reconstruction when Rabindranath Tagore first used this term he had in mind a society which is self-reliant a community which is not controlled by the centralised forces of foreign powers or even our own central or state government. He takes about 'Gram-Utthan' a community rising up with it's own efforts recreating its, itself reconstructing it self, for achiving its own vision". [१]

साराश रूपाने गावातील लोकांची योजना आखणे आपले प्रश्न समजून घेणे, जागृत होऊन विकासात सहभागी होणे हे पुनर्रचनेच्या दृष्टिने महत्त्वाचे मानले जाते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून ग्रामपुनर्रचनेचे प्रयत्न आपल्याकडे झालेले आहेत.

**ग्रामीण पुनर्रचनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत ग्रामीण पुनर्रचनेचे प्रयत्न विविध ठिकाणी समाजकार्यकर्त्यांनी केले आहेत. त्यातील महत्त्वाच्या काही प्रयोगाचा थोडक्यात आढावा घेतला तर पुनर्रचनेची क्षेत्रे लक्षात येतात.

**१. रवींद्रनाथ टागोर यांची योजना :**

१९०८ साली रवींद्रनाथ टागोरांनी कालिग्राम या आपल्या परगण्यात युवक संघटना उभारल्या. १९२१ साली श्रीनिकेतन येथे ग्रामबांधणी संस्था उभारली. आठ खेड्यांचा गट करून शेती, सहकार, उद्योगधंदे, शिक्षण व आरोग्य यात सुधारणा करण्यासाठी नेतृत्त्व स्वावलंबन, सहकार्य या गुणांची वाढ व्हावी म्हणून कार्यक्रम हाती घेतले. लोकांना कमी खर्चात औषधपाणी पुरविता यावे म्हणून ग्रामीण आरोग्य सेवा सहकारी संस्था काढली. आर्थिक विकासासाठी खेड्यातील व्यवसायांचा विकास करण्याचा प्रयत्न केला. वसतीगृहात्मक अशा शाळा काढल्या, ग्रामीण गरजा लक्षात घेवून ग्रामीण लोकांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. शेती प्रायोगिक केंद्र उघडले, कुक्कुटपालन, डेअरी असे उद्योग सुरू केले. फिरत्या वाचनालयाची सोय केली. या विधायक कार्यास आर्थिक मदत मिळू शकली नाही. त्यामुळे हा विकास कार्यक्रम मर्यादित राहिला.

**२. गुरगाव प्रयोग :**

ग्रामीण परिस्थितीचा अभ्यास करून पंजाबमधील गुरूगाव येथे श्री. एफ. एल ब्रायन यांनी ग्रामविकास चळवळ उभारली. गुरगाव येथे वरचेवर दुष्काळ पडे, कालव्याची सोय नव्हती, लोक अतिशय रोगपिडीत होते. ग्रामीण आरोग्य व स्वच्छता

याबाबत स्वत: ब्रायन पतीपत्नीने काम केले. गावोगावी जावून ते व्याख्यान देत आरोग्य रक्षणाचे शिक्षण देत. स्वच्छता कशी पाळावी, रोगप्रतिबंधक लसीचे महत्त्व इत्यादी गोष्टी लोकांना सांगत. त्यांनी सहकारी शेती करण्यास लोकांना प्रोत्साहन दिले. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी रात्रशाळा चालविल्या. लोकांना शेतीसाठी कर्ज देण्याची व्यवस्था केली. सहकारातून विकास कसा होतो हे कार्यातून दाखवून दिले. सामाजिक सुधारण्याच्या कार्यातही त्यांनी लक्ष घातले. बालविवाह थांबावेत, समारंभावरचा अनाठायी खर्च कमी व्हावा, मुलींना शाळेत पाठवावे याबाबतचे प्रबोधन करण्यासाठी व्यक्तीगत भेटी, चर्चा, व्याख्याने यांचा उपयोग केला. खेड्यातील माणसाने आपल्या प्रगतीच्या कामात स्वत: प्रयत्नशील रहावे ही कल्पना अभिप्रेत होती. सारांश रूपाने विविध संस्थांची स्थापना, ग्रामीण आरोग्य व स्वच्छता शेतीविकास, शिक्षण व सहकार्य, सामाजिक सुधारणा व एकसूत्रीकरण व प्रचार अशी या योजनेची हाती घेतलेल्या कार्याची विविध अंगे होती.

**३. ऐटावा योजना :**

१९४८ साली उत्तर प्रदेशात एटावापासून ११ मैलावर असलेल्या महेवा खेड्यात ही योजना सुरू करण्यात आली. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनावर या योजनेत भर होता. या योजनेत सार्वजनिक आरोग्य, कुटीर उदयोगधंदे इ. बाबी समाविष्ट होत्या.

**४. सर्वोदय योजना :**

महात्मा गांधीनी खेड्यांचे महत्त्व ओळखून खेड्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिने १८ मुद्यांचा एक कार्यक्रम आखला. यामध्यें खेड्यातील उद्योगधंदयांची वाढ,

मूलभूत व प्रौढ शिक्षण, आरोग्य व मागास वर्गाचा विकास, स्त्रियांचा उध्दार व राष्ट्रीय भाषांची वाढ किसान व विद्यार्थी यांच्या संघटना इ. बाबींचा समावेश होता. या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी अनेक संस्था देशभर उभारण्यात आल्या. महाराष्ट्रातही या योजनेला सुरूवात झाली. या योजनेत शेती, कुटीर उद्योगधंदे, सार्वजनिक आरोग्य इ. बाबींचा समावेश होता. स्वावलंबन, सहकार्य, साधेपणा, अहिंसा या मानवी मुल्यांचा विकास हे ध्येय होते.

## ५. कोसंबा योजना :

बडोदा संस्थानाचे नरेश सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेने त्यांचे दिवाण श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी यांनी नवसारी जिल्ह्यात कोसंबा येथे ग्रामीण विकास योजनेचे १९३२ मध्ये केंद्र उभे केले. या केंद्रातर्फे गावात कार्यकर्ते निर्माण करणे शेती विकास, पशुपालन इ. गोष्टींवर भर होता. या योजनेत काही मार्गदर्शक तत्त्वे ठरवून कार्य केले गेले. त्यात शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनात बदल घडविण्याचा प्रयत्न करणे. जीवनमान उंचावण्याची प्रेरणा त्यांच्यात निर्माण करणे, खेड्यातूनच योग्य नेतृत्त्वाचा विकास करणे याला महत्त्व दिले होते. शेती कार्यक्रमाबरोबरच, शैक्षणिक व नैतिक कार्यक्रमावरही भर दिला होता. ग्रामीण वाचनालय अनिष्ट रूढींचे निर्मूलन, प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम यावर त्यांचा भर होता. स्वावलंबन व सहकार ही दोन तत्त्वेही महत्त्वपूर्ण मानली होती.

## ६. मद्रास राज्यातील फिरत्या विकास योजना :

महात्मा गांधींकडून प्रेरणा घेऊन तामिळनाडूमधील ३४ खेड्यात ही योजना राबविण्यात आली. ग्रामवासियांचे जीवन उंचावण्यासाठी प्रबोधन, मार्गदर्शन व प्रोत्साहन देता येईल याची दक्षता घेऊन शेती, आरोग्य, शिक्षण, संघटना विकास इ. समावेश या

योजनेत होता. योजना राबविताना त्यात लोकांनी सहभागी व्हावे यादृष्टीने त्यांचे प्रबोधन केले गेले. लोकांनी स्वतःच योजना आखाव्यात यासाठी त्यांना अधिकार दिले होते. यासाठी शासनानेही मदत दिली होती. त्याचा हेतू ग्रामीण जनतेचे संघटन करणे, त्यांचे जीवन सुखी व समृध्द करणे व्यक्ती व समाजाचा घटक यादृष्टीतून ग्रामीण जनतेचा विकास करणे हा होता. स्वच्छता, शेती, पशूपालन खादी व ग्रामोद्योगांचा विकास, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रौढ शिक्षण इ. संबंधीत विकासात्मक कार्यक्रमांवर त्यात भर होता.

## ७. राळेगण शिंदी :

अलिकडील दोन दशकातील ग्रामीण पुनर्रचनेचा महत्त्वाचा प्रयोग म्हणून आण्णा हजारेंच्या राळेगणशिंदीचा विचार करणे आवश्यक आहे. अहमदनगर जिल्ह्यात राळेगणशिंदी येथे आण्णा हजारे यांच्या नेतृत्त्वाखाली ग्रामीण विकासाचे प्रयत्न १९७५ पासून सुरू झाले. आज ते गाव ग्रामीण विकासाचा नमुना मानले जाते. त्यांनी गावात सामुदायीक शेतीचा प्रकल्प राबविला त्यासाठी पाण्याची योजना केली. पाझर तलाव, नालाबंडींग इ. कामे त्यासाठी केली व त्यात सर्व गावकऱ्यांना सामिल केले. त्यामुळे जेथे ५०-६० एकर जमीन बागायती होती तेथे आज ते क्षेत्र हजार ते बाराशे एकर झाले आहे. शेतीला पूरक म्हणून त्यांनी कुटीर उद्योगांची वाढ केली. दुग्धव्यवसाय सुरू केला, लोकांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला. आरोग्याच्या संदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. लोकांना आरोग्याचे शिक्षण नव्हते, आरोग्याच्या काळजी आावी अनेक त्वचारोग तेथे होते. प्रथम शुध्द पाणी कसे मिळवावे याचे शिक्षण लोकांना दिले. प्रत्येकाच्या घरासमोर शोषखड्डे घेतले. शौचालयाची गरज पटवून दिली व सार्वजनीक स्वच्छता वाढविली. व्यसन निर्मूलन व अंधश्रध्दा निर्मूलन यासाठी प्रभावीपणे काम केले,

देवाला बळी देण्याची प्रथा नाहीशी केली. 'अंगात येणे सारख्या' गोष्टींवर प्रबोधन केले, काही वेळा अशा लोकांचे ढोंग उघड केले. श्रमदानाला महत्त्व देऊन गावातील प्रत्येक कामात गावातील श्रम शक्तीचा उपयोग केला. स्त्रियांचे संघटन करून त्यांच्यात आर्थिक स्वावलंबन निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ग्राम सभेला महत्त्व देऊन गावातील तंटे गावातच कसे मिटवता येतील यादृष्टीने न्यायपंचायत गावातच निर्माण केली. नैतिक शिक्षणावर भर दिला. त्यासाठी धार्मिक कार्यक्रमांचा उपयोग केला. अशा विविध कार्यक्रमातून आदर्श ग्राम निर्माण केले. या सर्व प्रयोगांचा अभ्यास केल्यानंतर ग्रामीण पुनर्रचनेची काही सर्वसाधारण क्षेत्रे सांगता येतात.

**ग्रामीण पुनर्रचनेची क्षेत्रे :**

**१. शेती सुधारणा :**

शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञान वापरले जावे, नवीन पध्दती उपयोगात आणाव्यात. तसेच नवीन यांत्रिक साधनांचा उपयोग व्हावा या साठी जागृती केली गेली.

**२. पुरक उद्योगधंदे व कुटीरउद्योग :**

गावातील लोकांचे शेतीचे उत्पन्न अपुरे असते. त्यांना पुरक उद्योग द्यावेत यादृष्टीने त्यांनी प्रयत्नशील व्हावे यासाठी कार्यक्रमात भर दिला आहे.

**३. आर्थिक स्वावलंबनाचे प्रयत्न :**

ग्रामीण आर्थिक जीवन सुधारावे, सावकारांकडून होणारे शोषण थांबावे यादृष्टीने पतसंस्था, सहकारी सोसायट्या किंवा अन्य मार्ग शोधून त्यातून लोकांना उभे राहण्याची प्रेरणा दिलेली दिसते.

**४. संघटन व नेतृत्त्व विकास :**

ग्रामीण भागातील लोकांचे संघटन व्हावे, त्यातून नेतृत्त्व विकास व्हावा यावर भर दिलेला आहे.

**५. अंधश्रध्दा घालविणे :**

ग्रामीण भागातील अंधश्रध्दा कमी व्हाव्यात या दृष्टीने कार्यक्रम आखले गेले.

**६. स्वावलंबन, सहभाग, पुढाकार व नेतृत्त्व विकास :**

लोकांनी स्वावलंबी व्हावे, स्वतः पुढाकार घेऊ न विकासाच्या योजना आखाव्यात, यासाठी प्रात्साहन.

**७. ग्रामीण स्वच्छता व आरोग्य :**

ग्रामीण भागातील आरोग्य सुधारावे, स्वच्छतेची योग्य जाणीव त्यांच्यात निर्माण व्हावी यासाठी लसीकरण, आहार याबाबत दक्ष रहावे असा प्रयत्न केला गेला आहे.

**८. सामाजिक सुधारणा :**

लहान वयात होणारे विवाह, विविध समारंभावर होणारा अनाठायी खर्च, स्त्री-पुरूष विषमतेच्या कल्पना याबाबत प्रबोधन करण्याचा प्रयत्न.

**९. ग्राम समित्या :**

गावाचा कारभार गावातील लोकांनीच चालवावा त्यांना लोकशाहीचे शिक्षण मिळावे, ग्रामपंचायतीने प्रभावी व्हावे असे प्रयत्न.

**१०. पर्यावरण जाणीव :**

नवीन प्रयोगात पर्यावरणाची जाणीव निर्माण करून वनीकरणास प्रोत्साहन दिलेले आहे.

**११. संघटन व विकास :**

युवक, स्त्रिया यांचे संघटन करून संघटनेतून विकासाला प्रेरणा दिलेली दिसते.

पुनर्रचनेतील विविध क्षेत्रात आज तंत्रविज्ञानाचा उपयोग करणे शक्य झालेले आहे. नवनवीन दृक-श्राव्य साधने आज विकसित झाली आहेत. महत्त्वाच्या क्षेत्रात आज त्याचा उपयोग करणे शक्य आहे.

**ग्रामीण पुनर्रचनेत तंत्रविज्ञानाचा उपयोग :**

ग्रामीण पुनर्रचनेत निवडलेल्या क्षेत्राच्या दृष्टीने तंत्रविज्ञानाचा उपयोग कसा करता येईल हे पाहणे महत्त्वाचे आहे. आरोग्य, अंधश्रध्दा व सहकारातून आर्थिक विकास ही तीन क्षेत्रे त्याचे महत्त्व व त्यात शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा उपयोग याविषयी माहिती घेणे संयुक्तीक ठरेल.

**१. आरोग्य शिक्षण :**

ग्रामीण भागातील आरोग्याचा प्रश्न हा आज महत्त्वाचा आहे. ग्रामीण पुनर्रचनेचे हे महत्त्वाचे क्षेत्र आहे. अजुनही ग्रामीण भागात पुरेशी शौचालये, स्वच्छतागृहे नाहीत. अस्वच्छतेच्या अभावी अनेक रोग फैलावतात. तसेच सार्वजनिक स्वच्छतेबाबत लोक दक्ष नाहीत. शासनातर्फे आरोग्याच्या संदर्भात जे यशाचे मोजमाप केले जाते. ते पुरविल्या जाणाऱ्या सोयींचा त्यात अधिक विचार असतो. परंतु रोग होऊ नयेत म्हणून आवश्यक जागृती करण्याकडे कमी लक्ष दिले जाते. या संदर्भातील प्रश्नाचे नेमके दर्शन

डॉ. एन्. एच्. आंटिआ यांनी इंडो सोव्हीएट सेमिनारमध्ये सादर केलेल्या निबंधातून स्पष्ट केले आहे. ते म्हणतात "आपण आपली प्रगती कशी मोजतो, कोणते निकष लावतो तर ते रोग्यांची संख्या, वैद्यक शास्त्राची संख्या व त्यांचे आकार औषधाची विपुलता व परदेशातून आयात केलेली अत्याधुनिक साधन सामुग्री इ. परंतु भारतात आजही मृत्यूला व शारीरिक दुर्बलतेला सर्वात जास्त कारणीभूत होणारे रोग हे साधे संसर्गजन्य प्रकारातील आहेत पण आपण महत्त्व देतो कर्करोग,ह्रदयविकार व रक्तदाब ह्यांना. सार्वजनिक पैसा व प्रयत्न शहरातील रोग बरे करण्याच्या प्रयत्नावर खर्च होत आहे. आरोग्य सेवेच्या एकंदर रकमेच्या ७०% रक्कम अशा तऱ्हेने खर्च होते उलट आपली ५०% लोकवस्ती ग्रामीण भागात आहे. त्त्यांना मात्र आरोग्य व औषधोपचाराच्या किमान सुविधाही उपलब्ध नाहीत. पुढे त्यांनी म्हटले आहे आरोग्य सेवेबरोबर आरोग्याचे आधारस्तंभ असलेले इतर घटक शारीरिक पोषण, शिक्षण, स्त्रियांना समान दर्जा, शुध्द पाणी पुरवठा, स्वच्छता, घरी व कामाच्या ठिकाणी आरोग्यशील वातावरण वैयक्तिक आरोग्य सवयी हे होत. मूलत: लोकांनीच स्वत:च प्रयत्नपूर्वक ह्या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवे व त्यासाठी उत्तेजन द्यायला हवे"[१०]

गावातील आरोग्य शिक्षणाचे महत्त्व वरील विचारातून स्पष्ट झाले आहे. आरोग्य शिक्षणासाठी दूरदर्शन व रेडिओ याचा उपयोग होतोच. परंतु गावातील सर्व लोकांकडे ही साधने उपलब्ध नसतात म्हणून आरोग्याच्या संदर्भात माहिती देणाऱ्या चित्रफिती दाखविणे, आरोग्याच्या दक्षतेबाबत तक्ते, प्रदर्शने दाखवून लोकांना जागृत करणे, मासिके, वृत्तपत्रे यातील लिखित साहित्यातून माहिती देणे स्वच्छतेची जाणीव साधनातून निर्माण करणे. गटचर्चा व्याख्याने यांचा उपयोग करून लोकांचा सहभागातून आरोग्य सुधारणा करणे म्हणजेच तंत्रविज्ञानाचा उपयोग करणे होय.

**२. अंधश्रध्दा निर्मूलन :**

आज ग्रामीण भागात अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा दिसतात. आपल्या देशातील साक्षरतेचे प्रमाण पाहता ४८% लोक निरक्षर आहेत. निरक्षरतेतून अज्ञान येते व अज्ञानातून अंधश्रध्दा. या अंधश्रध्देमध्ये गावात अंगात देव येणे, अंगात भूत येणे, केसात जट येणे, देवाला बोकड बळी देणे, साप चावला असता मांत्रिकाकडे जाणे इ. गोष्टी मोठ्या प्रमाणात दिसतात. बुध्दी व भावना या दोन्हीच्या साहाय्याने माणसाचे जीवन घडते. व्यक्तीमत्त्वात या दोन्हींचे संतुलन लागते यांचे संतुलन बिघडले की बुध्दी गहाण पडते व माणूस भावनेच्या आहारी जातो. व अनेक अंधश्रध्दांना बळी पडतो. ''श्रध्दा हा शब्द श्रत अधिक धा या धातु पासून आला आहे. श्रतचा अर्थ Belief or faith असा होतो आणि धा म्हणजे Belief in devine revelation or religious faith असा होतो ज्या कल्पनेवर दृढ विश्वास असतो अशा भावनेला आपण श्रध्दा म्हणतो. विमान, टेलिफोन यावर श्रध्दा आहे असे आपण म्हणत नाही त्याला आपण विश्वास म्हणतो. विश्वास अनुभवजन्य असतो, श्रध्दा डोळस नसते तिला आपण अंधश्रध्दा म्हणतो.''[11] ग्रामीण भागातील लोक अनेक प्रकारच्या अंधश्रध्दांना गरीबीमुळे व अगतिकतेमुळे बळी जातात. समाज व्यवस्थेतून येणारी दु:खे कमी होतील तशा अंधश्रध्दाही कमी होतील पण त्याचे निर्मूलन होणार नाही. म्हणूनच त्यासाठी सामाजिक परिस्थिती व मानवी मनाची स्थिती लक्षात घेऊन अंधश्रध्दा कमी करण्याचे प्रयत्न करायला हवे. काही अंधश्रध्दा अमानुष व अघोरी असतात. उदा. पातिव्रत्य सिध्द करण्यासाठी उकळत्या तेलातून नाणे काढायला लावणे. जट आली म्हणून मुलीला देवदासी बनविणे हे प्रकार खेड्यामध्ये अजूनही घडताना दिसतात. काही अंधश्रध्दा शकून अपशकूनाच्या कल्पनेतून येतात तर काही आरोग्याच्या संदर्भातही अंधश्रध्दा असतात. उदा. ठराविक भाज्या खाल्या तर जखम चिघळते, किंवा सापाचे विष मांत्रिक

उतरविती किंवा पोलीओ झालेल्या मुलावर अवैज्ञानिक उपचार केले जातात. तसेच चमत्कार करून अनेक बुवा लोक समाजाचे शोषण करतात. म्हणून अशा अंधश्रध्दा नाहीशा करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. अनुभूती, निरीक्षण, तर्क याआधारे विविध घटनांकडे पाहायला लोकांना शिकवायला हवे. स्त्रियांच्या संदर्भात विचार करता अनेक स्त्रीया पुजा-अर्चा, व्रत-वैकल्य याच्या आहारी जातात. उपास-तापासांचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अशक्त व मानसिक दृष्ट्या अशक्त स्त्रिया यात अधिक गुंतत जातात आणि मग त्यातूनच अंगात येणे वगैरे प्रकार सुरू होतात. त्यांच्यावर योग्य वैद्यकीय उपचार होण्याची गरज असते. या सर्व गोष्टींचा विचार करता वैज्ञानिक दृष्टीकोनांची रूजवणूक करण्याचे प्रयत्न अनौपचारिक शिक्षणातून व्हायला हवे. त्यासाठी वेगवेगळ्या साधनांचा पध्दतींचा उपयोग कसा करता येईल व हे अनौपचारिक शिक्षण परिणामकारक कसे करता येईल याचा विचार महत्त्वाचा ठरतो.

## ३. संघटन व आर्थिक स्वावलंबन :

गावातील पुनर्रचनेचा विचार करता संघटन, नेतृत्व विकास व आर्थिक स्वावलंबन या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. गावातील जाणत्या लोकांनी एकत्र येऊनच पूर्वी गावाचा कारभार चालविला होता आज ते स्वरूप नाहिसे झाले आहे. यादृष्टीने विविध संघटना निर्माण करून त्या कार्यरत करणे महत्त्वाचे, सहकार करण्याची प्रवृत्ती अत्यंत स्वाभाविकपणे असते. ग्रामीण पुनर्रचनेत लोकांनी एकत्र यावे आपल्या समस्या शोधाव्या, पर्यायी उत्तरे शोधावी, प्रयोग करावेत अशी अपेक्षा असते. यादृष्टीने लोकांनी एकत्र येणे, संघटना उभारणे महत्त्वाचे आहे. सहकार हा आजच्या युगाचा पाया आहे. आज सहकारी खरेदी विक्री संघ, सहकारी साखर कारखाना ग्रामोद्योक बँका अशा अनेक

संस्था सहकारातून उभ्या राहिलेल्या दिसतात. यातून आर्थिक विकासाचे कार्य घडते परंतु बऱ्याचवेळा त्यात गावातील ठरावकि सधन वर्गाचे प्राबल्य असते ग्रामीण जनतेला दारिद्रयातून वर आणणारी सहकार ही एक गुरूकिल्ली आहे परंतु त्यात स्त्रियांचा सहभाग हा नावापुरताच असतो. म्हणून स्त्रियांचे संघटन करणे त्यातही शेतमजूर, कामगार व शेतकरी स्त्रियांना एकत्र आणून आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविणे. त्यासाठी विविध उद्योगाच्या दृष्टीने त्याला विचार करायला लावणे. एकमेकींना सहकार्य करण्याची भावना निर्माण करणे, आर्थिक स्वावलंबनातून त्यांच्या आत्मविश्वास निर्माण करणे, यासर्व गोष्टी स्त्रियांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यादृष्टीने बचत गटाची स्थापना महत्त्वाची आहे. श्री. आण्णा हजारे यांनी आपल्या गावात तसेच ग्रामीण भागाच्या विकासासाठी ज्या स्वयंसेवी संस्था काम करतात त्यांनी आपल्या कार्यात स्त्रियांचे बचत गट करण्याला प्राधान्य दिले आहे. ग्रामीण पुनर्रचनेचे ते एक महत्त्वाचे साधन बनले आहे. बचत गटाला स्वयंमदत गट असेच म्हटले जाते. शासनानेही या योजनेला प्रोत्साहन दयायचे ठरविले आहे. अंगणवाडी सेविकांचे ते एक महत्त्वाचे कार्य आहे. यातून स्त्रियांचे संघटन होते त्यांच्या अडचणी सोडविल्या जातात, छोटे उद्योग उभे राहतात, म्हणजेच सहकार्यातून विकास होतो.

यादृष्टीने या तीन क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करून या क्षेत्रांतील बदलासाठी कोणकोणती साधने वापरता येतील, उपलब्ध साधनांचा किती उपयोग होतो या संदर्भात विचार करणे योग्य ठरेल.

**तंत्रविज्ञानाची विविध साधने व पध्दती याचे महत्त्व :**

**१. दूरदर्शन व आकाशवाणी :**

आज ग्रामीण भागात दूरदर्शन व आकाशवाणी ही दृक-श्राव्य साधने पोहचली आहे. लोकशिक्षणाची ही उत्तम साधने आहेत परंतु या साधनांचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी केला तर लोकशिक्षण म्हणून त्यांचे जे कार्य आहे ते साध्य होऊ शकणार नाही. दूरदर्शनच्या संदर्भात १९७५ साली सॅटेलाईअ ईस्ट्रक्शनल टेलीव्हीजन एक्सपरीमेंट याचे उद्‌घाटन होऊन शैक्षणिक क्षेत्रात दूरदर्शनचा कसा उपयोग होईल यासाठी परिसंवाद घेतला गेला. त्यातील दोन सूचना ग्रामीण भागात दूरदर्शनचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या.

१. दूरदर्शनने विज्ञान, तंत्रज्ञान, शेती व आरोग्य, कुटुंबनियोजन याबाबतीत विशिष्ट व अनुकूल अशा दृष्टीकोनाचा प्रसार व प्रचार केला पाहिजे.

२. दूरदर्शनने लोकांच्या दैनंदीन जीवनाच्या समस्या सोडविण्यासाठी विज्ञानाचा वापर करण्याविषयी अनुकूल अशा दृष्टीकोनाचा प्रसार व प्रचार केला पाहिजे.

या दोन्ही सूचना ग्रामीण पुनर्रचनेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. आज या दृष्टीने नवनवीन कल्पनांचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्यक्रम दूरदर्शनवर असतात. जगातील विविध घडामोडी दूरदर्शनवर दाखविल्या जातात. 'सुरभी' सारख्या कार्यक्रमातून अनेक ठिकाणची विशेष माहिती दिली जाते. शेतीमधील नवनवीन तंत्रे व पध्दती याचा प्रचार केला जातो. मुलांचा आहार, त्यांची काळजी याबाबत तज्ज्ञांची व्याख्याने असतात. आकाशवाणीवरही स्त्रियांसाठी माहिती देणारे विविध कार्यक्रम असतात. चिंतनसारख्या कार्यक्रमातून जीवनमूल्य बिंबविली जातात. परंतु याचा योग्य उपयोग होतो का? तो करण्याबाबत जागृती कशी करता येईल यासाठी विविध कार्यक्रमावर गटचर्चा घेऊन कार्यक्रम पाहण्याची दृष्टी निर्माण करता येईल.

**२. चित्रफिती :**

रेडिओ व दूरदर्शनवरील कार्यक्रमांवर आपले नियंत्रण नसते. परंतु आज ग्रामीण भागात ग्रामपंचायतीमध्ये दूरदर्शन संच आले आहेत. (V.C.R.) दृश्य-ध्वनी मूद्रकांचा उपयोग करून ग्रामीण भागात नेमक्या विषयावरची माहिती चित्रफि तीचा उपयोग करून देता येईल. शेतीविषयक, आहारविषयक, आरोग्यविषयक, कला संस्कृती इ. अनेक गोष्टींची माहिती करून देण्यासाठी, चलत चित्रपट हे एक प्रभावी शैक्षणिक साधन आहे. ग्रामीण स्त्रियांचा फु रसदींचा वेळ लक्षात घेवून ग्रामपंचायतीतील दूरदर्शन संचाचा उपयोग करून विविध विषयावरच्या चित्रफि ती दाखविता येतील. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ एज्यूकेशन, पुणे यांनी अनौपचारिक शिक्षणाच्या विविध चित्रफि ती तयार के ल्या आहेत व अतिशय माफ क किंमतीत त्या विकतही मिळतात. त्याचा उपयोग करून ग्रामीण महिलांसाठी शिक्षण देता येईल. या चित्रफि तींची यादी पाहिली तरी त्यांच्या माहितीचा आवाका केवढा मोठा आहे हे कळते. उदा. नव्या युगाची साथ, वनराई, आपण बायका, महिला विकास शिबिर, लग्नाचे करू नका विघ्न इ. पंचेचाळीस मिनिटाच्याच या चित्रफि ती असल्याने स्त्रियांना उपलब्ध होणाऱ्या वेळाचा उपयोग करून त्या दाखविता येतात व दृक-श्राव्य साधन असल्यामुळे प्रभावीपणे लोकशिक्षण होते.

**३. तक्ते व चित्रप्रदर्शन :**

ग्रामीण भागातील लोकांच्यासाठी आरोग्य, लोकसंख्या, पाणीबचत, शिक्षणाचे महत्त्व इ. संदर्भात विविध तक्ते शासनाने तयार केले आहे. त्या तक्त्यातून सहजपणे लोकशिक्षण होऊ शकते. त्यावरच्या छोट्या वाक्यातून मोठा आशय व्यक्त करणारे

घोषवाक्येही फार मोठा परिणाम सहजपणे करून जातात. अलिकडे अनेक स्वयंसेवी संस्था विविध प्रकारचे अनौपचारिक शिक्षण देण्यासाठी चित्रप्रदर्शने तयार करतात. कुठेही ती लावता येतील अशी सोयही करतात. चित्रामुळे आकर्षकता वाढते व कमी वेळात लोक ती पाहून जावू शकतात. लोकांच्या सोयीने त्यांचे आयोजन करता येते. लोकविज्ञान चळवळींचीआरोग्यावर सुदर प्रदर्शने आहेत. तसेच स्त्री-मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अशी स्त्रियांना विविध प्रश्नावर जागृत करण्यासाठी 'चित्रप्रदर्शने' तयार केले आहे. या चित्रप्रदर्शनातून ग्रामीण स्त्रियांचे शिक्षण प्रभावीपणे होऊ शकते.

**वृत्तपत्रे व मासिके :**

"पुस्तके व वर्तमानपत्रांचे कार्यचमुळी कळविणे / सुचविणे, टीका करणे आहे".[१२] सामाजिक सुधारणा करण्यात वर्तमानपत्राचा सिंहाचा वाटा आहे. आज वृत्तपत्राचे स्वरूपच बदलले आहे. त्यात विविध सदरे असतात क्रीडा, आहार, आरोग्य, स्त्री-प्रश्न, अर्थव्यवहार या संबंधात विविध प्रकारचे ज्ञानाचे भांडार वृत्तपत्रे आपल्या समोर ठेवतात. पण उपयोग करण्याची वृत्ती जागृत केली पाहिजे. गावात सार्वजनिक ठिकाणी वृत्तपत्रे ठेवण्यात ही वृत्ती तयार होऊ शकेल विविध गटचर्चेतूनही वृत्तपत्रातील कात्रणे वाचून दाखविता येतील.

आज प्रौढांसाठी खास अनौपचारिक शिक्षण देण्यासाठी विविध पुस्तके तयार केली आहेत. त्यात आरोग्य, दैनंदिन जीवनातील स्वच्छता, संघटन या संदर्भात माहिती दिली आहे. ती वाचून दाखवून त्यावर चर्चा घेणे, वृत्तपत्रातील काही कात्रणे ठेवणे व ती वाचून दाखविणे, साधना, मिळून साऱ्या जणी या सारख्या मासिकात अनेक स्त्रियांच्या जागरूकतेच्या दृष्टीने अनुभव दिलेले असतात. व्यक्ती परिचय असतो. त्यातून काम करण्याची प्रेरणा मिळू शकते. ग्रामीण विकासास त्याची मदत होऊ शकते.

**पथनाट्य व प्रत्यक्ष प्रयोग :**

आज पथनाट्यातून प्रभावीपणे विचारजागरण करता येते याची जाणीव अनेकांना झाली आहे. व्याख्यानापेक्षा प्रभावीपणे आपण पथनाटयातून एखादा विचार लोकांसमोर मांडू शकतो त्याच प्रमाणे 'प्रत्यक्ष प्रयोग' विशेषत: अंधश्रध्दा निर्मूलनासाठी याचा उपयोग होतो. जशा ताराबाई मोडक यांनी लोकांच्या दारापर्यंत शाळा नेल्या व कुरणशाळा / अंगणवाडी अशा शाळा विकसित केल्या. त्याप्रमाणे अंधश्रध्देच्याबाबत प्रबोधन करण्यासाठी प्रत्यक्ष चमत्कार व त्याचे विश्लेषण - वस्तीत असे प्रयोग करता येणे शक्य आहे. त्यातून लोकांचे चमत्कारामागील वैज्ञानिक सत्य उलगडून दाखविता येते. प्रत्यक्ष चर्चा करून त्यांच्या शंकांचे निरसन करता येते. काही प्रयोगात गावातील तरूणांना सामील करून घेता येते. म्हणून या माध्यमांचा उपयोगही ग्रामीण पुनर्रचनेत महत्त्वाचा ठरतो.

**गटचर्चा :**

तंत्रविज्ञान म्हणजे केवळ दृक-श्राव्य साधनांचा उपयोग नव्हे तर अध्यापन परिणामकारक करण्यासाठी श्रम व वेळ याची बचत करून कोणत्या पध्दती ज्ञानाची माध्यमे म्हणून वापरता येतील त्याचा विचारही महत्त्वाचा गटचर्चा या माध्यमातून संवाद शक्य होतो. ''ज्या समस्येचा सहभाग्यांशी व श्रोतृवर्गाशी संबंध येतो त्या समस्येविषयी एक वाक्यता करण्याचा पाच ते दहा जणांचा गट प्रयत्न करतो त्याला गटचर्चा असे म्हणतात. ह्या छोट्या गटांची चर्चा निश्चित कालावधीत श्रोतृवर्गापुढे चालते. चर्चेच्या अखेरीस श्रोतृवर्ग महत्त्वाचे प्रश्न विचारतो. त्यांची उत्तरे तज्ञ देतो.''[३] गटचर्चेने समस्येबाबत अभिरूची निर्माण होऊन उचित दृष्टीकोन विकसीत केला जातो. समस्या

उकलनाची व तर्कशुध्द विचाराची क्षमता वाढते. ग्रामीण भागातील अंधश्रध्दा दूर करणे, आरोग्यविषयक दृष्टीकोन निर्माण करणे, आर्थिक स्वावलंबनाची जाणीव निर्माण करणे यासाठी हे संवादाचे माध्यम उपयुक्त ठरते. तसेच प्रत्यक्ष लोकांचा ग्रामीण विकासात सहभाग वाढविण्यासाठी गटचर्चेचा फायदा होतो. यादृष्टीने याचा उपयोग अधिक करायचे ठरविले.

**व्याख्याने :**

एखादा विषय अभ्यासपूर्वकरीतीने लोकांच्यासमोर मांडणे तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने ठेवून शक्य होते. तज्ज्ञ व्यक्ती एखादया विषयाची सखोल अभ्यासक असते. त्याविषयासंबंधीचे अनेक पैलू त्या व्यक्तीने अभ्यासलेले असतात. त्यामुळे व्याख्यान विचाराला अधिक चालना देऊ शकते. व्याख्यानाची लोकप्रियता कमी झाली असली तरी शेती, आरोग्य, लोकसहभाग महत्त्व इ. मार्गदर्शनपर व्याख्याने उपयुक्त ठरतात. याचा उपयोग करून घेण्याचे ठरविले.

**प्रत्यक्ष भेटी / सहली :**

एखादे कार्य प्रत्यक्ष पाहण्याचा परिणाम अधिक असतो. कृषीविद्यापीठाला भेट किंवा राळेगणशिंदीसारख्या गावाला भेट हे प्रेरणादायी ठरू शकते. त्यामुळे हे माध्यमही उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे नियोजित घटक लक्षात घेऊन व विविध माध्यमांचा उपयोग करून कार्यक्रमाची कार्यवाही करण्याचे ठरविले. त्या कार्यवाहीचे नियोजन व कार्यवाहीचा अहवाल पुढील प्रकरणात दिला आहे.

**संदर्भ :**


१. ह. ना. जगताप, प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान (पुणे : नूतन प्रकाशन १९९१) पृ.९.

२. सुमन ओक , शैक्षणिक तंत्र विज्ञान (पुणे : श्री. विद्या प्रकाशन १९८४) पृ. १५.

३. ह. ना. जगताप, प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान (पुणे : नूतन प्रकाशन १९९४) पृ.१७.

४. मधुकर सोनार, दृक-श्राव्य शिक्षण साहित्य तंत्र व पध्दती (पुणे : गो. य. राणे प्रकाशन, १९७०), पृ. १६.

५. न. रा. पारसनीस, शिक्षकांचे प्रशिक्षण (पुणे : नूतन प्रकाशन १९९३), पृ.१५५.

६. ना. ए. चुनखडे, वि. भ. पाटिल, ग्रामीण समाजशास्त्र (कोल्हापूर : फडके प्रकाशन १९९०), पृ. ११५.

७. वि. दा. केसरी, समाज विज्ञान कोष (पुणे : समाज विज्ञान मंडळ १९८७), पृ.३९९.

८. गुरूनाथ द. नाडगौडे, ग्रामीण समाजशास्त्र (पुणे : कॉन्टीनेंटल प्रकाशन १९७६), पृ. १८७.

९. एस्. एस्. कुलकर्णी, एज्युकेशन टेक्नॉलॉजी इयर बुक (न्यू दिल्ली : ऑल इंडिया असोशियन फॉर एज्यूकेशनल टेक्नॉलॉजी १९८९), पृ. २.

१०. अ. गो. कानडे भारतीय आरोग्य सेवा (पुणे : इंडियन इन्स्टीटयूट ऑफ एज्यूकेशन १९८८), पृ. ३५.

११. नरेंद्र दाभोळकर, भ्रम आणि निरास (पुणे : राजहंस प्रकाशन १९८६), पृ. ६.

१२. उषा राव, शैक्षणिक तंत्रविज्ञान (नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ १९७५), पृ. ३०.

१३. न. रा. पारनीस, उपरोक्त, पृ. १८१.